वर्तमानपत्रात जाहीरात द्यावयाचा नमुना

वसंतराव नाईक राज्य कृषि विस्तार व्यवस्थापन व प्रशिक्षण संस्था
व्हीआयपी रोड, धरमपेठ, नागपूर ४४० ०१०
E Mail – Vanamati.cptp@gmail.com Phone- 0712 2555999, 2541944

क्रं : वनामती/आस्था/से.नि./विवक्षित–नियुक्ती/2021/ ३९४२ दिनांक २२ /12/2021

# जाहीरात

वनामती, नागपूर येथील एकत्रित परिविक्षाधिन प्रशिक्षण कार्यक्रम अंतर्गत आस्थापना/लेखा व वित्त विषयक विविक्षित कामे करणेसाठी महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा वर्ग –2 संवर्गातील 2 पदांसाठी सेवानिवृत्त अधिका–यांचे एम्पॅनेल (नामिकासूचि) तयार करावयाचे असून त्यासाठी विहीत नमुन्यात अर्ज मागविण्यात येत आहे. विविक्षित कामासाठी नामिकासूचि मधून निवड केलेल्या उमेदवारांना पारिश्रमिक तथा इतर शर्ती व अटी सामान्य प्रशासन विभाग शा नि क्रं संकिर्ण –2715/प्रक 100/13 दिनांक 17.12.2016 नुसार लागू राहतील.

अर्जाचा विहीत नमूना व सविस्तर शर्ती व अटी या कार्यालयाचे वेबसाईट www.vanamati.org या संकेतस्थळामधील NEWS & EVENTS या लिंक वर तसेच कार्यालयाचे सूचना फलकावर उपलब्ध आहे.

अर्ज पोस्टाने किंवा व्यक्तीशः सादर करण्याचा अंतीम दिनांक 07.01.2022 दुपारी 5.00 वाजेपर्यंत असून यानंतर प्राप्त झालेल्या अर्जाचा विचार करण्यात येणार नाही.

संचालक
वसंतराव नाईक राज्य कृषि विस्तार
व्यवस्थापन प्रशिक्षण संस्था, नागपूर

वसंतराव नाईक राज्य कृषि विस्तार व्यवस्थापन व प्रशिक्षण संस्था
व्हीआयपी रोड, धरमपेठ, नागपूर ४४० ०१०
E Mail – Vanamati.cptp@gmail.com Phone- 0712 2555999, 2541944

क्रं : वनामती/आस्था/से.नि./विविक्षित कामे/2021/ २९४२ दिनांक २२ /12/2021

# जाहीरात

( वनामती अंतर्गत विवक्षित कामासाठी नामिकासूची करणेबाबत)

वनामती, नागपूर येथील एकत्रित परिविक्षाधिन प्रशिक्षण कार्यक्रम अंतर्गत आस्थापना/लेखा व वित्त विषयक विविक्षित कामे करणेसाठी महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा वर्ग -2 संवर्गातील 2 पदांसाठी सेवानिवृत्त अधिका-यांचे एम्पॅनेल (नामिकासूचि) तयार करावयाचे असून त्यासाठी विहीत नमुन्यात अर्ज मागविण्यात येत आहे.

1. उमेदवार महाराष्ट्र शासनाच्या महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा वर्ग 2 पदावरुन सेवानिवृत्त झालेला असावा.

2. प्रशिक्षण संस्थेत यापुर्वी कामे केलेल्या उमेदवारांना प्राधान्य देण्यात येईल.

3. सेवानिवृत्त लेखाधिकारी यांची नियुक्तीच्या कालावधीत कर्तव्ये व जबाबदा-या पुढीलप्रमाणे राहतील

1 एकत्रित परिविक्षाधिन प्रशिक्षण कार्यक्रम अंतर्गत प्रशिक्षण शुल्क अनुदान मागणी करणेसाठी संबधीत विभाग/मंत्रालय यांचेकडे पाठपुरावा करणे तसेच इतर विभागाकडील प्रशिक्षणे वनामती संस्थेस घेतल्यास संबधीत विभागाकडून प्रशिक्षण शुल्क वसूल करणेसाठी पत्रव्यवहार करणे

2 संबधीत प्रशिक्षण कार्यक्रम राबविणेसाठी आवश्यक खरेदी प्रकीया राबविणे. खर्चास मंजूरी घेणे

3 रोखपुस्तक तपासणी, रोख शिलकेची पडताळणी, धनादेश तयार करणे, आरटीजीएस विवरणे तयार करणे दरमहा बॅकेतील शिल्लक रोख पुस्तीकेप्रमाणे असल्याबाबत (Bank Reconciliation) पडताळणी करणे

4 वनामती संस्थेस प्राप्त होणारे वेतन व वेतनेतर अनुदानाबाबत बीडीएस वर उपलब्ध अनुदान व कोषागारातून आहरित केलेले अनुदान याबाबत महालेखाकार कार्यालयाशी ताळमेळ घेण्यात येउन ताळमेळ विवरणपत्र शासनास सादर करणे आवश्यकतेनुसार वर्षाअखेर निधि समर्पीत करणे व संबधीत पत्रव्यवहार

5 प्राप्त अनुदानाचे उपयोगीता प्रमाणपत्र महालेखापाल कार्यालयास सादर करणे व संबधीत शासन पत्रव्यवहार

6 प्राप्त अनुदानाचे वर्षाअखेर विनियोजन लेखे, कार्यक्रम अंदाजपत्रक तयार करणे

7 प्रशिक्षण कार्यक्रमाअंतर्गत आवश्यक अनुदानासाठी वार्षीक, चारमाही, आठमाही अंदाजपत्रके तयार करणेसंबधी पत्रव्यवहार

8 महालेखापाल कार्यालयाकडील लेखा आक्षेप वगळणेसंबधी पत्रव्यवहार व महालेखापाल कार्यालयास वेळोवेळी प्रत्यक्ष भेट

9 योजने अंतर्गत प्राप्त अनुदान व खर्चाचे लेखापरिक्षण सनदी लेखापाल यांचेकडून करून घेणे व त्यांनी घेतलेल्या आक्षेपांची पुर्तता करणे

10 आवश्यकता भासल्यास कार्यक्रमात प्रशिक्षण समन्वयक म्हणून कामे करणे.

11 आवश्यकनुसार गरज भासल्यास म.ना. सेवा नियम, वित्तीय नियम याबाबत प्रशिक्षण वर्गात मार्गदर्शन देणे

12 कार्यालयीन कामकाजासाठी आवश्यकतेनुसार दौरा करणे

13 वरीष्ठ अधिका-यांच्या निर्देशानुसार संस्थेअंतर्गत सुरु असलेल्या इतर योजना/ वनामती व्यवस्थापनासंबधी कामे

**4. सेवानिवृत्त लेखाधिकारी यांना उपरोक्त तरतूदीबरोबर सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक 17/12/2016 रोजीच्या शासन निर्णयातील पुढील अटी व शर्तीही लागू राहतील.**

1. नामिकासूची मध्ये नावे समाविष्ट असलेल्या उमेदवारा पैकी संस्थेच्या निकडीनुसार जास्तीत जास्त 12 महिन्याच्या कालावधीसाठी किंवा संबधीत योजना संपेपर्यत किंवा सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय दिनांक 17.12.2016 नुसार नामिकासूचीची वैधता (3 वर्षे) असेपर्यत यापैकी जे अगोदर घडेल त्या कालावधीसाठी नियुक्त करण्यात येईल.

2. सेवानिवृत्त अधिका-यांना अदा करावयाचे मासिक पारिश्रमिक सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय दिनांक 17.12.2016 नुसार अदा करण्यात येईल.

3. उपरोक्त शासन निर्णय दिनांक 17.12.2016 नुसार उमेदवाराचे वय 65 वर्षाचे आत असावे.

4. विविक्षित कामासाठी अर्ज करणारा उमेदवार शारिरिक व मानसिक व आरोग्याच्या दृष्टीने सक्षम असावा तसेच प्रस्तावित सेवेकरिता त्याचेकडे आवश्यक क्षमता असावी.

5. नियुक्तीसाठी सक्षम प्राधिकारी यांना विशेष परिस्थितीत कोणत्याही वेळी अशा अधिका–यांच्या सेवा समाप्त करण्याचे अधिकार राहतील.

6. विवक्षित कामासाठी नियुक्ती असल्याने संबधीतास नियमित सेवेचे इतर कोणतेही लाभ मिळण्याचा अधिकार/हक्क नसेल.

7. विवक्षित कामासाठी नियुक्त करण्यात आलेली व्यक्ती, सोपविलेली सेवा पार पाडण्याच्या कामात व्यत्यय निर्माण होईल अशा कोणत्याही व्यावसायिक कामात गुंतलेली नसावी.

8. करार पध्दतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तीने गुंतलेले हितसंबध (Conflict of Interest) जाहिर करणे आवश्यक राहील.

5. इच्छूक उमेदवारांनी साध्या (ए4 साईज) कागदावर सोबत जोडलेल्या विहीत नमुन्यात अर्ज करावा.

6. अर्जाचे लिफाफ्यावर **वनामती अंतर्गत लेखा व वित्त संबधी विवक्षित कामसाठी नामिकासूचि मध्ये नावे समाविष्ट करणेबाबत अर्ज** असे ठळक अक्षरात नमूद करावे.

7. अर्ज सादर करण्याचा अंतीम दिनांक 07.01.2022 असून सदर दिवशी दुपारी 5.00 वाजेपर्यंत अर्ज स्विकारण्यात येतील त्यानंतर आलेले अर्ज विचारात घेतल्या जाणार नाही. पोस्टाने अर्ज पाठविल्यास झालेल्या विलंबास वनामती कार्यालय जबाबदार राहणार नाही.

8. प्राप्त अर्जाचे अनुषंगाने निवडीबाबत कार्यवाही करण्याचे संपुर्ण अधिकार वनामती संस्थेस असून अर्ज नाकारला गेल्यास याबाबतचे कोणतेही स्पष्टीकरण/लेखी सूचना देण्यास संस्था बांधील राहणार नाही.

दिनांक22.12.2021

संचालक

वसंतराव नाईक राज्य कृषि विस्तार

व्यवस्थापन प्रशिक्षण संस्था, नागपूर